# उद्यान पंडीत पुरस्कार - २०१३

## श्री. डॉ. मकरंद अरविंद आठवले

### मु. पो. नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड



४१

- वैद्यकीय क्षेत्राबरोबरच कृषी, सामाजिक, शैक्षणिक तसेच सहकार क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने भरीव कामगिरी.
- कांदा, वांगी मिरची, टोमॅटो, भोपळा, कलिंगड, चिबूड यासारख्या फळांचे उत्पादन व पावसाळ्यात शेताच्या बांधावर आवळा आणि चिकू यांची लागवड.
- परिसरातील शेतक-यांच्या सहकार्याने आंबा व नारळ विकास मंडळाची स्थापना
- देशी वाणाची गुरे पाळल्याने जैविक खत आणि गोबर गॅस या दोन्ही गोष्टी उपलब्ध तसेच विजेची बचत ही काळाची गरज ओळखून घरी ‘सौरजनित्र’
- ठिबक सिंचनाचा वापर करून फळबाग क्षेत्र आणि इतर बागायत क्षेत्र ओलिताखाली.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २०१३

## श्री. प्रविण बाबुलाल पाटील

## मु.पो.फरकांडे, ता.एरंडोल, जि.जळगाव



- मागील ३ वर्षामध्ये टरबूज हे फळपिक, मिरची, भेंडी भाजीपाला व झेंडू या फुलपिकाची लागवड.
- राष्ट्रीय फलोत्पादन अभियान योजनेतून पॉली हाऊसची उभारणी व त्यामध्ये रंगीत ढोबळी मिरचीचे भरघोस उत्पादन.
- टरबुजाच्या पिकासाठी प्लॅस्टीक मल्चिंगचा वापर
- वेगवेगळ्या वर्तमान पत्रामधून रंगीत ढोबळी मिरचीची प्रसिध्दी,
- गांडूळ खत व जैवीक खताचा वापर व सिंचनासाठी सूक्ष्म सिंचनाचा वापर
- संरक्षीत पाणी देण्यासाठी शेततळयाची उभारणी
- कृषि विभागामार्फत राबविल्या जाणा-या शेतीशाळा, कार्यशाळा, धान्य महोत्सव व शेती प्रदर्शनामध्ये आवर्जून सहभाग.

४२

# उद्यान पंडीत पुरस्कार - २०१३

## श्री. भिमराव यशवंतराव गाजरे

### मु. पो. ईनामगाव, ता. शिरुर, जि. पुणे



४३

- मागील ३ वर्षामध्ये खरबुज, कलिंगड व पपई इ. फळपिके मिरची, वांगी, स्विटकॉर्न इ. भाजीपाला पीके व कार्नेशिएन, झेंडू इ. फुलपिकांची लागवड.
- फळपिकांची प्रतवारी करुन त्यांची मॉलमध्ये विक्री.
- टरबूज व खरबूजासाठी प्रामुख्याने प्लॅस्टीक मल्चींगचा वापर
- पॉली हाऊसची उभारणी
- हिरवळीच्या खतासाठी ताग व धैंचा पिकाची लागवड
- गावामध्ये २५ शेततळयाची निर्मिती व पूरक व्यवसाय म्हणून कुक्कुटपालन.
- पुणे येथील धान्य महोत्सवात खपली गव्हाची विक्रमी विक्री
- खरबुज शेतीची यशोगाथा साम टी.व्ही. वर प्रसारीत

# उद्यान पंडीत पुरस्कार - २०१३

## श्री. राजकुमार बापू आडमुठे

### मु. पो. तमदलगे, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर



- केळीपासून धागा निर्मिती व त्यापासून साहित्य बनविणे, आंबा लोणचे, डाळिंब, पापड इत्यादीसाठी महिला बचत गटांना प्रशिक्षण
- शेतक-यांना प्रशिक्षण मिळावे यासाठी २० लाख रुपये खर्चून शेतक-यांच्या प्रबोधन केंद्राची उभारणी.
- केळी काढणी पश्चात तंत्रज्ञान या विषयावर ५० ते ६० चर्चासत्रामध्ये मार्गदर्शनपर व्याख्यानामधून शेतक-यांना केळी गुणवत्ता व निर्यात याविषयी प्रबोधन
- सन २००९-१० मध्ये ११० शेतक-यांची संजीवनी ॲग्रो फळ-फुले खरेदी विक्री सहकारी संस्थेची स्थापना
- कै. भिमगोंडा दादा पाटील कृषि विज्ञान मंडळाची स्थापना
- पीपीपी-आयएडी अंतर्गत कोल्हापूर व सांगली जिल्हयात सुमारे २०० एकर क्षेत्रावर केळी पिकाचा कॉन्ट्रॅक्ट फार्मींगचा प्रयोग.

४४

# उद्यान पंडीत पुरस्कार - २०१३

## श्री. विष्णू बाबूराव आंबेकर

### मु.पो. तेलवाडी, ता. पैठण, जि. औरंगाबाद



४५

- ❖ एकूण १०.९४ हेक्टर क्षेत्र, त्यापैकी २.११ हे. मोसंबी, १.०० हे. डाळिंब, ०.१० हे. सिमला मिरची, १.०० हे. कांदा अशी पिके
- ❖ बालाजी या नावाने मोसंबीची रोपवाटीका कार्यरत
- ❖ मोसंबी, डाळींब व सिमला मिरची या पिकांच्या काढणीपश्चात तंत्रज्ञानाचा वापर करुन विक्री.
- ❖ कांदाचाळ असून त्यामध्ये कांद्याची साठवण व शेडनेट हाउसमध्ये शिमला मिरचीची लागवड .
- ❖ आय.आय.एच.आर हिस्सारगट्टा बंगलुरु येथे भाजीपाला पिकाचे प्रशिक्षण
- ❖ मोसंबीच्या मातृवृक्षाची व सागाची लागवड
- ❖ दुध उत्पादक संस्थेचे चेअरमन

# उद्यान पंडीत पुरस्कार - २०१३

## श्री. दत्तप्रसाद ऊर्फ राजेंद्र मथुरादासजी मुंदडा

### मु. पो. शिराढोण, ता. कळंब, जि. उस्मानाबाद



- एकूण ९.४७ हे. जमिन असून त्यामध्ये प्रामुख्याने आंबा, मोसंबी ही फळपिके तर भेंडी, दोडका, मिरची, पालक इ. भाजीपाल्याची आणि झेंडू, निशिगंधा इ. फुलपिके, आल्यासारखी मसाला पिके.
- हायडेन्सीटी व कॅनोपी व्यवस्थापन करुन नविन तंत्रज्ञानावर आधारीत फळबागेचे संगोपन .
- फलोत्पादन प्रक्रिया उदयोग व साठवणूक संदर्भात लखनौ येथील आंबा संशोधन केंद्रावर प्रशिक्षण.
- ओसाड माळरानाचे नंदनवन करुन श्रीकृपा फार्महाऊसची निर्मिती व श्रीकृपा केशर नर्सरीची स्थापना
- परभणी कृषि विद्यापीठाकडून शेंगा काढणे व फोडणी यंत्राचे तंत्रज्ञान आत्मसात करुन ८० एकर भूईमुग क्षेत्रामध्ये वापर
- उस्मानाबाद आयकॉन व आदर्श पालक पुरस्कार प्राप्त.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २०१३

## श्री. महादेव काशिराम भोयर

### मु. पो. सोयता, ता. जि. वाशिम



४७

- एकूण ५.२७ हे. जमिन असून आंबा १.० हे., आवळा १.० हे. तर ०.२० हे. मध्ये शेडनेट.
- शेडनेटमध्ये प्रचलीत शेतीच्या मानाने ४ पट जास्त उत्पादन.
- सामाजिक कार्यक्रम, शेतकरी मेळावे, स्वयंसहाय्यता गट, महिला गट इत्यादींना प्रोत्साहन.
- सामूहिक शेततळयाच्या पाण्यावर भाजीपाला व फळपिकांची जोपासना.
- शेडनेटमध्ये काकडी पिकाची यशस्वी लागवड व टोमॅटोला वर्तमानपत्रात प्रसिध्दी.
- कोरडवाहू शेती तंत्रज्ञानाचा अंगिकार, कंपोस्ट खत वापर, मूलस्थानी जलसंधारण, सरी वरंबा पध्दतीने लागवड, गांडूळखत निर्मिती इत्यादीचा वापर

# उद्यान पंडीत पुरस्कार - २०१३

## श्री. नागोराव रामचंद्र टोंगे

### मु. पो. धामणा (लिंगा), ता.जि. नागपूर



- एकूण ४.१३ हेक्टर शेती असून संत्रा १.१० हेक्टर व ३.०० हेक्टर क्षेत्रावर भाजीपाला पिके.
- संपूर्ण शेती ठिबक सिंचनाखाली आणून त्यामध्ये मल्चिंग शिटचा वापर व सरीवरंबा पध्दतीचा वापर.
- भाजीपाला पिकांकरीता संकरित, सुधारीत बियाणांचा वापर करुन तांत्रिक पध्दतीने रोपे तयार करुन त्याची लागवड करणे यासारखा उच्च तंत्रज्ञानावर आधारीत प्रकल्प.
- भाजीपाला, फळांचे उत्पादन करुन फळांचे ग्रेडींग करुन त्याची विक्री
- बिजप्रक्रिया, फवारणी, बायोडायनामिक कंपोस्ट स्वतःच घरी तयार करुन त्याचा वापर व बियाणाची उगवणशक्ती तपासून बियाणांची पेरणी.
- कापूस पिकाच्या विक्रमी उत्पादनाचा तालुकास्तरीय उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार.

४८

# उद्यान पंडीत पुरस्कार - २०१३

## श्री. अनंत दिगंबर प्रभूआजगावकर

### मु. पो. आडेली, ता.वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग



- १.५१ हेक्टर सामाईक क्षेत्रामध्ये नवनवीन शेतीप्रयोग.
- प्रादेशिक फळसंशोधन केंद्र वेंगुर्ला येथील शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रोक्त पध्दतीने १.५१ हेक्टर क्षेत्रावर काजू लागवड व संपूर्ण सेंद्रिय पध्दतीने काजू बागेची जोपासना करुन हेक्टरी ३ मे. टन एवढे उत्पन्न.
- तणांचा बंदोबस्त करण्यासाठी ग्रासकटरचा वापर व काजू बागेमध्ये अंतरमशागत करण्यासाठी १२ एच.पी. पॉवर टीलरचा उपयोग.
- कोकणात स्थानिक हिरवी पांढरी भेंडीच्या ३-४ जाती अस्तित्वात, या स्थानिक जाती संकलीत करुन व सतत सात वर्ष प्रयोग करुन लाल गुलाबी भेंडीचा नवीन वाण विकसीत, या प्रयोगाची दखल टेक फॉर सेवा अ सोशिओ टेक्निकल कॉन्फरन्स ऑन इनक्ल्युझिव्ह अॅन्ड सस्टेनेबल सोशल डेव्हलपमेंट या पुस्तकात घेण्यात आली .

४९

# उद्यान पंडीत पुरस्कार - २०१३

## श्री. सुरेश काशिनाथ कदम

### मु. नेउरगांव पो. जळगांव ने, ता. येवला, जि. नाशिक



५०

- गणेश १३७ जातीच्या डाळींब पिकाचे २.४० हेक्टर क्षेत्र, येवला तालुक्यात सन १९८९ साली डाळींबाची लागवड करणा-या निवडक शेतक-यांमध्ये समावेश.
- कांदा, फळपिके, ऊस इत्यादी पिकास ठिबक सिंचन पध्दतीचा वापर
- पीक काढणीनंतर कांदा चाळ, पॅक हाऊसचा वापर, तसेच फळाची प्रतवारी करुन मालाची विक्री
- फुलशेतीमध्ये झेंडूची लागवड
- उताराला आडवी मशागत व पेरणी.
- शेततळ्याच्या माध्यमातून सिंचन.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २०१३

## श्री. भारत एकनाथ शिंदे

### मु.पो. बोरी, ता. इंदापूर, जि. पुणे



५१

- द्राक्षे, डाळींब, पपई व केळी ही फळपिके.
- केळी पिकासाठी स्कर्टिंग व प्लास्टिक मल्चिंगचा वापर.
- मर रोग नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा व बॅसिलोमायसिस या जैविकाचा वापर.
- विविध शेतकरी मेळाव्याचे आयोजन तसेच आयसीअेआर इन्स्टीटयुट, नवी दिल्ली, येथे ५५ शेतक-यांच्या सहलीचे आयोजन.
- साम टिव्ही. व ई-टिव्हीच्या शेती कार्यक्रमामध्ये सहभाग
- महाग्रेपच्या माध्यमातून द्राक्षांची युरोपमध्ये निर्यात तसेच देसाई फ्रुट कंपनीशी करार करुन निर्यात